दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १७३ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Tuesday 17 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 173 • Pages 4 • Rate 4 Rs

### नरहरी झिरवळांच्या क्लार्कच्या घराचीही झडती

**मुंबई**–मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयात लाच घेताना एका लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने रंगेहात पकडल्याची घटना उघड होताच राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणामुळे संबंधित खात्याचे मंत्री नरहरी झिरवळ अडचणीत आले आहेत. मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात कार्यरत कर्मचारी लाच घेताना सापडल्याने विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार टीका सुरू केली आहे. राजीनाम्याची मागणीही पुढे आली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर चौकशी यंत्रणांनी कारवाईचा वेग वाढवला आहे आणि प्रकरणाची सखोल छाननी सुरू केली आहे.या प्रकरणातील आरोपी कर्मचारी राजेंद्र ढेरिंगे याला सोमवारी न्यायालयात हजर केले जाणार असल्याची माहिती आहे. त्याआधी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने नाशिक रोड येथील त्याच्या घराची झडती घेतली. या झडतीदरम्यान काही महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आल्याचे समोर आले आहे. या कागदपत्रांमधून आणखी माहिती उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस पावले उचलावीत-उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## अल्पसंख्याक संस्थांच्या दर्जा प्रमाणपत्र प्रकरणांची सखोल चौकशी करून कठोर कारवाईचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक विकास विभागाची आढावा बैठक सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रुचेश जयवंशी, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सहसचिव मनोज जाधव, उपसचिव मि. प. शेणॉय, अवर सचिव सारंगकुमार पाटील, अवर सचिव जहांगीर खान, अवर सचिव विशाखा आढाव तसेच अवर सचिव मेघना शिंदे उपस्थित होत्या.राज्यातील अल्पसंख्याक समुदायाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी शासन कटिबद्ध आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री आदरणीय दादांनी ठरवून दिलेल्या ध्येयधोरणांनुसारच विभागाची वाटचाल व्हावी. सच्चर समितीच्या शिफारशीनुसार २१ फेब्रुवारी २००८ रोजी राज्यात स्वतंत्र अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागामार्फत शैक्षणिक शिष्यवृत्ती, वसतीगृहे, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांच्या कर्ज योजना, जैन आर्थिक विकास महामंडळाच्या थेट कर्ज व व्याज परतावा योजना, स्वयंसहायता बचत गट, कौशल्य विकास व पायाभूत सुविधा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिल्या.मौलाना आझाद महामंडळाच्या शैक्षणिक कर्जाची मर्यादा ५ लाखांवरून २० लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्याचे सांगून, या योजनेचा लाभ प्रत्यक्ष गरजूंनाच मिळेल याची काटेकोर दक्षता घ्यावी, असेही सुनेत्रा पवार यांनी बजावले. तसेच राज्यातील ‘डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना’ अंतर्गत पायाभूत सुविधांचे अनुदान २ लाखांवरून १० लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले असून, पात्र संस्थांची निवड करताना पूर्ण पारदर्शकता राखावी, असे निर्देशही सुनेत्रा पवार यांनी दिले.अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येणारी वसतीगृहे तातडीने पूर्ण करून कार्यान्वित करावीत. अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील विकासकामांसाठी वितरित होणाऱ्या निधीचे समप्रमाणात वाटप होऊन कामांचा उत्कृष्ट दर्जा राखला जावा, याची जबाबदारी विभागाने घ्यावी, असे निर्देश सुनेत्रा पवार यांनी दिले. नांदेड, सोलापूर आणि मालेगाव येथील उर्दू घरे कार्यान्वित असून, इतर प्रस्तावित उर्दू

**अल्पसंख्याक समाजासाठी असलेला निधी प्रत्येक घटकाला समप्रमाणात आणि पारदर्शकपणे वितरित व्हावा, तसेच विभागाचे कामकाज अधिक लोकाभिमुख व समाजाप्रती उत्तरदायी राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी दिल्या. तसेच शाळांना चुकीच्या पद्धतीने अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेल्या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सुनेत्रा पवार यांनी दिले.**



घरांची कामेही विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. विभागातील रिक्त पदांमुळे प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देत त्यांनी वक्फ मंडळातील १७९ मंजूर पदांपैकी ९६, वक्फ न्यायाधिकरणातील ३४ पैकी २५ आणि हज समितीतील १३ पैकी १० रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करावी, असे आदेश दिले. यावेळी त्यांनी संभाजीनगर विभागीय आयुक्तांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून आवश्यक त्या सूचना दिल्या. छत्रपती संभाजीनगर येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या अल्पसंख्याक आयुक्तालयासाठी आवश्यक अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देत आयुक्तालय सशक्त करावे, असेही सुनेत्रा पवार यांनी सांगितले.बार्टी व सारथीच्या धर्तीवर स्थापन झालेल्या ‘मार्टी’ (MRTI)च्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन प्रगती अहवाल सादर करावा. अल्पसंख्याक समाजातील बेरोजगारीचे प्रमाण लक्षात घेता तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर कौशल्यवृद्धी कार्यक्रम राबवून त्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी विभागाने सक्रिय पुढाकार घ्यावा, असे सुनेत्रा पवार यांनी नमूद केले. खारघर, नवी मुंबई येथे प्रस्तावित ‘श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शाहिदी समागम’ कार्यक्रमाच्या आयोजनासंदर्भातील सर्व प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी दिले.

# रमाई घरकुल आवास योजनेत गैरकारभार, माजलगाव येथे बेमुदत आमरण उपोषण आंदोलनाची सुरुवात




दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

मानवी हक्क अभियान, कष्टकरी एकनाथराव आवाड उसतोड कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आज दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालय, माजलगाव येथे बेमुदत आमरण उपोषण आंदोलनास सुरुवात करण्यात आली.सन २०२४-२५ रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत पुरुषोत्तमपुरी येथे १८ घरकुलांचे टार्गेट मंजूर झाले होते. त्यापैकी १६ लाभार्थ्यांची नावे ऑनलाईन करण्यात आली; मात्र त्याच यादीत ५ लाभार्थ्यांची नावे २ ते ३ वेळा पुनरावृत्ती झाल्याने ७ पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.या संदर्भात ऑपरेटर, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळेच हा प्रकार घडल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. वंचित राहिलेल्या ७ लाभार्थ्यांची नावे तात्काळ ऑनलाईन करून त्यांच्या खात्यावर घरकुलाच्या हप्त्याची रक्कम जमा करावी, तसेच संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.आंदोलनस्थळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित असून मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# माजलगावमध्ये जातीय शिवीगाळ व जीव घेणा हल्ला; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम अंतर्गत कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील रविवारी रात्री घडलेल्या मारहाण प्रकरणी पाच जणांविरुद्ध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जातिवाचक शिवीगाळ, जीवे मारण्याचा प्रयत्न व धमकी दिल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. फिर्यादी शुभम रुपचंद कांबळे (वय २४, रा. जयभीमनगर, माजलगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते साबळे हॉस्पिटल येथे कंपाउंडर म्हणून कार्यरत आहेत. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता ड्युटी संपवून स्कुटी (MH 23 BK 5193) वरून घरी जात असताना चव्हाण हॉस्पिटलसमोर आरोपी रवि मारोती कुन्हाडे (रा. वडारवाडा) याने पल्सर मोटारसायकलवरून स्कुटीला कट मारला. स्कुटीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असल्याचे पाहून आरोपीने जातिवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर आरोपीने मुद्दाम स्कुटीला धडक देऊन त्यांना खाली पाडले. यावेळी विशाल नागोराव चव्हाण, विलास नागोराव चव्हाण, राहुल नागोराव चव्हाण व लक्ष्मण भगवान शिंदे हे घटनास्थळी येऊन सर्वांनी मिळून मारहाण केली, असे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच पोट व छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कसाबसा सुटका करून ते माजलगाव शहर पोलीस ठाण्याकडे गेले. त्यानंतर त्यांच्या वडिलांनाही आरोपींनी मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. ही घटना १५ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता घडली असून १६ फेब्रुवारी रोजी पहाटे १२.३६ वाजता तोंडी फिर्याद नोंदविण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलमे १०९(१), ११५(२), ११८(१), १८९(२), १९१(२), ३५१(२), ३५२ तसेच ॲट्रॉसिटी कायद्यातील कलम ३(१)(ि), ३(१)(ि), ३(२)(ीं) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

# सततच्या नापिकीला कंटाळून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**


तालुक्यातील मांजरम येथील तरुण शेतकरी तानाजी माधवराव पुंजाजी (वय ३८) यांनी सततच्या नापिकीला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना १५ फेब्रुवारीच्या दुपार नंतर उघडकीस आली. या घटनेमुळे मांजरम परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तानाजी पुजाजी हे शेतीवर उदरनिर्वाह करणारे कष्टकरी शेतकरी होते. मागील काही हंगामांपासून सततचे हवामान बदल, पावसाचे अनियमित प्रमाण व पिकांचे होणारे नुकसान यामुळे त्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता. सततच्या नापिकीमुळे निर्माण झालेल्या नैराश्यातून त्यांनी गावातील विठ्ठल मंदिराशेजारी असलेल्या त्यांच्या राहत्या घरी १४ च्या रात्री च्या सुमारास दुसऱ्या मजल्यावर जाऊन गळफास घेऊन जीवन संपविले.

घटनेची माहिती समजताच ग्रामस्थांनी तातडीने धाव घेतली. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून शेतकऱ्यांवरील वाढता आर्थिक व मानसिक ताण पुन्हा एकदा समोर आला आहे.

मृत तानाजी पुजाजी यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, आई, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून ग्रामस्थांकडून त्यांना धीर दिला जात आहे.

दरम्यान, संबंधित घटनेची नोंद पोलिसांत करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. सततच्या नापिकीमुळे शेतकरी अडचणीत सापडत असल्याने शासनाने तातडीने मदत व आधार देण्याची मागणी परिसरातून होत आहे.



# सतीश मुंडे हत्या प्रकरणातील पाच आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

धाराशिव जिल्ह्यातील चोरखळी येथील कला केंद्रावर मारहाणीत झालेल्या बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील औषध विक्रेता सतीश मुंडे मृत्यू प्रकरणातील अटक असलेल्या पाचही आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.


बीड जिल्ह्यातील साळेगाव ता. केज येथील औषध विक्रेते सतीश मुंडे हे दि. १२ फेब्रुवारी रोजी त्यांच्या मित्रा सोबत धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील महाकाली कला केंद्रावर नाचगाणे पाहण्यासाठी गेले होते. तिथे दारूच्या नशेत त्यांच्या भांडण झाले. त्या भांडणाचा व मागील काही वर्षापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून गावाकडे परत येत असताना दि. १३ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री गावाकडे परत येत असताना शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्दन गित्ते आणि दत्ता बाबासाहेब तोंडे त्यांनी संगनमत करून सतीश मुंडे यास छातीत व पोटात लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्या मारहाणीतच सतीश मुंडे यांचा मृत्यू झाला. सतीश मुंडे याचा मृत्यू झाल्या नंतर शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी याने रात्री १:०० वाजण्याच्या सुमारास सतीश मुंडे याला त्याच कारमधून साळेगाव येथे त्याच्या घरी घेऊन आला. घरी आल्या नंतर सतीश मुंडे यांच्या आई वडीलांना त्याने सांगितले की, सतीश मुंडे हा खूप दारू पिलेला असल्याने तो बेशुद्ध पडला आहे. सतीश मुंडे यांच्या वडिलांनी सतीश यास आवाज दिला असता त्याने काही हालचाल केली नाही किंवा प्रतिसाद दिला नाही. म्हणून सतीश मुंडे यांचे वडील, चुलते आणि चुलत भाऊ यांनी सतीश मुंडे याला केज येथील उपजिल्हा रुग्णालयात घेऊन गेले. परंतु तेथील कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी त्यांना अंबाजोगाई येथे जाण्याचा सल्ला दिला. अंबाजोगाई येथे सतीश मुंडे याला घेऊन गेल्या नंतर स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण




रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सतीश मुंडे मयत झाल्याचे घोषित केले. त्या नंतर मयत सतीश मुंडे यांचे वडील भागवत बळीराम मुंडे यांनी दि. १५ फेब्रुवारी रोजी येरमाळा जि. धाराशिव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्दन गित्ते आणि दत्ता बाबासाहेब तोंडे (सर्व रा. साळेगाव ता. केज जि. बीड) यांच्या विरुद्ध गु. र. नं. ३८/२०२६ भा. न्या. सं. १०३, १९१(२), ११५(२) नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्दन गित्ते आणि दत्ता बाबासाहेब तोंडे या पाच जणांना ताब्यात घेऊन अटक केले. या खून प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी कळंब न्यायालयात हजर केले असता सर्व पाचही आरोपींना दि. १८ फेब्रुवारी पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिस कोठडीतील आरोपीं कडून या हत्या प्रकरणातील आणखी काही गुन्हेगारांची नावे उघड होण्याची शक्यता असून मयत सतीश मुंडे याला महाकाली कला केंद्रात आणखी कुणी मारहाण केली हे स्पष्ट होईल. येरमाळा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तात्या भालू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक स्वप्नील भोजगुडे हे तपास करीत आहेत.

# संपादकीय

## क्रिप्टोचा घातक शिरकाव



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारून सहा महिने होताहेत तोच नानाविध पद्धतींनी त्यांनी अनेक प्रस्थापित आराखडे, संकल्पना तोडूनमोडून टाकल्या आहेत. त्यात आयात शुल्काचे युद्ध, जागतिक रखवालदाराच्या भूमिकेतून घेतलेली माघार, मित्रराष्ट्रांचा उघड अपमान किंवा हरित ऊर्जेच्या क्षेत्रात मारलेली कोलांटउडी अशा अनेक गोष्टींचा समावेश होईल. यामुळे ट्रम्प यांची क्रिप्टोकरन्सीच्या क्षेत्रातील घोडदौड काहीशी दुर्लक्षिली जात आहे. मात्र, क्रिप्टोच्या माध्यमातून ट्रम्प कुटुंबीयांनी अत्यल्प कालावधीत जमवलेली माया आणि त्यासाठी गेल्या सहा महिन्यात अमेरिकेची यासंदर्भातली बदलण्यात आलेली धोरणे ही चिंतेची गोष्ट आहे. या आधीच्या कार्यकाळात ट्रम्प यांनी क्रिप्टोकरन्सीला 'महाघोटाळा' म्हणून संबोधले होते; परंतु आता त्यांनी त्या घोटाळ्याचे महानायक बनण्याचे ठरवले की काय, अशी शंका येते. गेल्या वर्षी त्यांच्या कुटुंबीयांनी 'वर्ल्ड लिबर्टी फायनान्शियल' नावाची कंपनी काही संशयास्पद व्यक्तींच्या मदतीने स्थापन केली. त्यामार्फत 'ढठणचझ'सारखे ' मीम कॉईन ' बाजारात आणून, त्याची भरपूर जाहिरात करून गुंतवणूकदारांना ट्रम्प यांना प्रत्यक्ष भेटण्याचा, सोबत भोजनाचा मान देण्यात आला.याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे, ट्रम्प यांच्या या क्रिप्टोकरन्सी संलग्नतांमुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात विदेशी शक्तींचा हस्तक्षेप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर पाकिस्तानला भारताने दिले, तेव्हा युद्धविरामानंतर ट्रम्प यांच्या फर्मने पाकिस्तान क्रिप्टो कौन्सिलशी भागीदारी केली, ज्यामध्ये उच्चपदस्थ पाकिस्तानी अधिकारी आणि लष्करी नेतृत्वाचाही समावेश होता. बदल्यात पाकिस्तानी लष्करप्रमुखाला थेट 'व्हाइट हाऊस'मध्ये भोजनासाठी निमंत्रित करण्यात आले. जेव्हा अमेरिकेसारख्या देशाचे राजकीय नेतृत्व अशा अपारंपरिक आर्थिक साधनांमध्ये थेट हितसंबंध ठेवते, तेव्हा 'क्रिप्टो-प्रेरित राजकारण' उदयाला येऊ शकते, आणि ते भू-राजकीय स्थैर्यालाही आव्हान देऊ शकते.अमेरिकेत अर्थातच यावरून मोठा वादंग निर्माण झाला आहे. डिजिटल मालमत्तेला अनुकूल कायदे मंजूर करणे, गृहकर्जासाठी राखीव मालमत्ता म्हणून मान्यता देणे किंवा अमेरिकन नागरिकांच्या निवृत्तीवेतनाच्या पोर्टफोलिओमध्ये त्यांचा समावेश करणे, तसेच आर्थिक नियमकांवर अनुकूल व्यक्तींची नेमणूक करून संशयित गुन्हेगारांविरुद्ध सुरू असलेल्या शोधमोहिमा थांबवणे यासारख्या अध्यक्षांच्या कृती वैयक्तिक आर्थिक लाभ मिळवण्यासाठीच्या आहेत, असा आरोप केला जात आहे. राष्ट्राध्यक्षांसारख्या उच्च पदावर असलेल्या व्यक्तीने, आपल्या अधिकाराचा वापर करून स्वतःच्या हिताची धोरणे आखणे, हे सार्वजनिक विश्वासाचा भंग करणारे कृत्य होय. एखाद्या राष्ट्राध्यक्षाने तेल उद्योगात स्वतःची प्रचंड गुंतवणूक असताना, तेल कंपन्यांना थेट फायदा होईल असे कायदे केले असते, तर समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटली असती; मात्र, क्रिप्टो करन्सीच्या अपारदर्शक स्वरूपामुळे, या कृतींना आर्थिक प्रगती'च्या नावाखाली झाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.आज अनेक जण या नव्या तंत्रज्ञानाकडे एक आर्थिक क्रांती म्हणून पाहत आहेत, मात्र त्यातील संभाव्य धोके प्रचंड आणि चिंताजनक आहेत. विशेषतः क्रिप्टोकरन्सी हे अंमली पदार्थांची तस्करी, शस्त्रास्त्रांची तस्करी, दहशतवादी आणि संघटित गुन्हेगारीसाठी मनी लाँडरिंगचे एक प्रमुख साधन बनले आहे. बेकायदा आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांसाठी डिजिटल मालमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ट्रम्प प्रशासनाने मात्र अशा गैरव्यवहारांना आळा घालण्याऐवजी, क्रिप्टोकरन्सीला अधिकाधिक वापरकर्ते कसे मिळतील त्यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. बेकायदा उद्योगांना लपवण्यासाठी क्रिप्टोकरन्सी अधिकाधिक उपयुक्त बनत जाणार. अशा धोरणांमुळे आर्थिक प्रणाली अस्थिर होऊन सट्टेबाजीचे बुडबुडे निर्माण होऊ शकतात, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला आहे.आर्थिक प्रणालींमधील अतिशिथिलता आणि त्यात गुंतलेले हितसंबंध या जोडगोळीमुळे २००८ मध्ये आधी अमेरिकेची आणि त्यामुळे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था संकटात सापडली होती. आज पुन्हा त्याच धोक्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या वैयक्तिक गुंतवणुकी, नियामक हस्तक्षेप आणि अपारदर्शक विदेशी संस्थांशी वाढते संबंध यामुळे डिजिटल मालमत्ता ही अमेरिकेच्या भविष्यातील आर्थिक अस्थिरतेचे कारण बनू शकते, आणि ते पूर्ण जगाचे अर्थकारण दूषित करून टाकू शकते. कठोर नियम आणि पारदर्शकतेअभावी, अनियंत्रित डिजिटल चलनांचा आणि अनिर्बंध राजकीय सत्तेचा संगम हा भ्रष्टाचार, भांडवलाची पळवापळवी आणि भू-राजकीय हेराफेरीला पोषक ठरू शकतो.

# संत सेवालाल महाराज जयंती व सोनाजीराव अध्यापक विद्यालयाचे छात्र आंतरवासियता शिबीर समारोह उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील हरकी लिमगाव येथील जिल्हा परिषद शाळेत संत सेवालाल महाराज जयंती व सोनाजीराव अध्यापक विद्यालयाचा छात्र आंतरवासियता शिबीर समारोह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. . या कार्यक्रमाचे अध्यक्ष लिमगावं जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग देशपांडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव येथील सोनाजीराव अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य एकनाथ चव्हाण होते. या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित शाळेचे ज्येष्ठ शिक्षक सत्यवान भुंबे, अनिल राठोड , राठोड भिमराव, प्राध्यापिका श्रीमती उषा चौरे मॅडम ,श्रीमती रेणुका आदमाने मॅडम , गोपाळ पवार, गणपती ढवळे, प्रमोद काळे ,भारत राऊत , भिमाशंकर राठोड , गणेश भदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.




छात्रसेवाकाल शिबिराचे मुख्याध्यापक शेख मुस्कान मॅडम पर्वेक्षक रेणुका ढेरे मॅडम यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुस्कान मॅडमने केले.

सोनाजीराव अध्यापक विदयालयाचे प्राचार्य एकनाथ चव्हाण हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सेवालाल महाराज जयंती विषयी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला व मुलांना अनमोल असे मार्गदर्शन केले.

तसेच काळे, राठोड यांनी पण विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी सोनाजीराव अध्यापक विद्यालयाचे प्राध्यापक, प्राध्यापिका याच्यासह लिमगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप देशपांडे यांनी केला. शेवटी आभार प्रदर्शन पवन नखाते यांनी केले.

# आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थिनींनी अभ्यास करावा-डॉ.सौदागर

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

ध्येय निश्चित केल्याच यश प्राप्ती होते. आई वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते केज येथील सरस्वती कन्या प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्ष मुख्याध्यापिका श्रीमती डोंगरे,प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर,श्री चाळक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक श्री जोगदंड यांनी केले. यावेळी ते म्हणाले संयमाने जग जिंकता येते असे मत व्यक्त केले.श्री चाळक म्हणाले अभ्यास करून परिस्थिती बदलता येते. अध्यक्षीय समारोप करताना श्रीमती डोंगरे म्हणाल्या शिस्त आणि संस्कार विद्यार्थ्यांच्या अंगी असणे आवश्यक आहे. ज्ञानाची शिदोरी घेऊन जीवन समृद्ध करा असे मत व्यक्त केले. यावेळी श्री



ढाकणे,श्री सुसंगे,श्रीमती नेहरकर, श्रीमती मोठाडे आदींची उपस्थिती होती. यावेळी दहावीच्या अनेक विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. पुढे बोलतांना डॉ सौदागर म्हणाले कॉपी पासून दूर राहा.शिक्षणाचा उपयोग व्यवहारीक जीवनामध्ये केला पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाशी आपला संबंध जोडलेला असतो. शिक्षण घेत असताना आपण सर्वप्रथम आपला मार्ग शोधला पाहिजे तरच आपल्याला ते ध्येय साकार करता येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांशी प्रमाणिक राहून अभ्यास करावा यामुळे आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करता येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन नववीच्या विद्यार्थिनीनी केले कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रयत सामाजिक प्रतिष्ठानकडून पसायदान अनाथ आश्रमात फळवाटप

## विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटली आनंदाची झळाळी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत पसायदान अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना फळवाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. प्रतिष्ठानचे मार्गदर्शक आर. जी. माने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. समाजातील गोरगरिब, गरजू विद्यार्थी आणि वंचित घटकांसाठी सातत्याने विविध मदतकार्य करणाऱ्या रयत सामाजिक प्रतिष्ठानने यावेळी पसायदान अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून त्यांना पौष्टिक फळांचे वाटप केले. याबाबत आश्रमाचे संचालक गोवर्धन दराडे यांच्याशी चर्चा करून




हा उपक्रम आयोजित करण्यात आला. फळवाटप कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. सामाजिक कार्यातून विद्यार्थ्यांना आधार देण्याचा आणि त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. या कार्यक्रमास संदीप कुलकर्णी, भागवत शेळके, गणेश माने, उदय देशमुख, प्रमोदजी रामदासी, संग्राम माने, रुद्र माने, सोनू कावरे, श्रेयश बोंगाणे तसेच रयत सामाजिक प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते. समाजातील गरजू घटकांसाठी अशा प्रकारचे उपक्रम पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार प्रतिष्ठानने व्यक्त केला.

# रायगडमध्ये आम्ही शान राखली : महेंद्रशेठ घरत

दैनिक वादळ वार्ता
**उलवे । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत सत्तेचा व पैशांचा प्रचंड वापर करणाऱ्या महायुतीच्या झंझावातासमोर भलेभले धाराशाही झाले असताना काँग्रेसने लढलेल्या ३ पैकी २ जागा जिल्हा परिषदेवर प्रचंड बहुमताने जिंकून काँग्रेसचा झेंडा फडकविला. त्यामुळे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत हेच खरे डॉन आहेत. काँग्रेसमध्ये मंत्री, आमदार, खासदार झाल्यानंतर अनेकांनी काँग्रेसलाच सोडचिठ्ठी दिली; परंतु काँग्रेसशी निष्ठावंत राहून महेंद्रशेठ रायगडची खिंड लढवत आहेत, हे निश्चितच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन श्रीरंग बर्गे यांनी अलिबाग येथे केले. ते 'अलिशान कप'च्या उदघाटनप्रसंगी अलिबाग-सोगाव येथे बोलत होते. ते पुढे म्हणाले, महाविकास आघाडीचे नेतृत्व करताना आपल्या चाणक्य नीतीने ऐनवेळी भावना घाणेकर यांना उमेदवारी जाहीर करून उरणचे आमदार महेश बालदी यांना 'पळता भूई थोडी केली' व उरण नगर परिषदेवर महाविकास आघाडीच्या माध्यमातून महेश बालदी यांच्यावर मात करत त्यांची घमेंड उतरविली. तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीची मोट बांधत स्वतः माघार घेऊन काँग्रेसच्या वाट्याच्या तीन जागा शिवसेना, शेकापला सोडून पुढची रणनीती आखली. उरण मतदारसंघाचा ट्रेंड ठरविणाऱ्या उरण पंचायत



समितीवर ७.१ असे घवघवीत यश संपादन करून महाविकास आघाडीचा झेंडा फडकविला. त्यामुळे महेंद्रशेठ घरत यांनी २०२९ ची आमदार महेश बालदी यांची वाट बिकट केली आहे, किंबहुना विधानसभा जिंकण्याचा मार्ग मोकळा केला आहे. चिरनेर, जासई जि. प. मतदारसंघात तरुण तडफदार उमेदवारांना उमेदवारी देऊन युवकांना प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे, हे तरुणाईला दाखवून दिले.रायगडमध्ये काँग्रेसने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तीन जागा लढविल्या आणि दोन जागा जिंकल्या. रायगड हा मतदारसंघ दिवंगत माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले आणि दिवंगत आमदार मधुकर ठाकूर यांचा आहे. राज्यात अनेक जिल्ह्यांत काँग्रेसची पीछेहाट झाली आहे, अशावेळी रायगडमधील यश निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. त्यामुळे रायगडमध्ये आम्ही काँग्रेसची शान राखली, असे अभिमानाने म्हणू शकतो, असे काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत अलिबाग-सोगाव येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते प्रकाश झोतात आयोजित केलेल्या 'अलिशान कप'चे उदघाटन झोकात झाले. अखंडपणे सोगावमध्ये सलग १३ वर्षे क्रिकेट सामने भरवून येथील तरुणांनी आपल्यातली जिद्द दाखविली आहे.

यावेळी ते पुढे म्हणाले, क्रिकेटचा मी चाहता आहे. मी फक्त क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन करत नाही, तर गावोगावी मैदाने मिळवून देतोय, अलिबागमध्ये मधुशेठ ठाकूर यांच्या नावाने हक्काचे मैदान हवे. राजाभाऊ ठाकूर यांच्या पराभवामुळे आमचा 'गड आला, पण सिंह गेला' असे मला वाटते. बॅरिस्टर अंतुले साहेब यांच्या विचारांची कास धरून रायगड आपल्याला पुन्हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे, हे दाखवून द्यायचे आहे. त्यासाठी राजाभाऊ ठाकूर यांनी आतापासूनच पुढची तयारी सुरू करावी. राजाभाऊ ठाकूर म्हणाले, मी खचलेलो नाही, मॅच फिक्सिंग झाली. फिल्डिंगमध्ये कमी पडलो, परंतु मी शेवटपर्यंत लढणारच आहे. ठाकूर घराण्याची मान उंचावणारच. सुनील थळे म्हणाले, हार-जित होते, शिस्तप्रियता हवी, येत्या काळात राजाभाऊ निश्चितच त्यांचा करिष्मा दाखवतील.यावेळी एसटी काँग्रेसचे श्रीरंग बर्गे, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, राजाभाऊ ठाकूर, अ‍ॅड. प्रवीण ठाकूर, सुनील थळे, रवींद्र ठाकूर, अ‍ॅड. उमेश ठाकूर, नगरसेवक समीर ठाकूर, माजी सरपंच जगन्नाथ पेडवी, माजी उपसरपंच अशोक नाईक, अनिल जाधव, विलास गायकवाड, अनिता शिंदे, सानिका घाडी आदी उपस्थित होते. यावेळी अवघ्या पाच वर्षांच्या शिवांश याने लाठीकाठी स्पर्धेची चमक प्रेक्षकांसमोर दाखवून क्रीडाप्रेमींची मने जिंकली. त्याची इंडोनेशिया येथे लाठीकाठी स्पर्धेसाठी निवड झाल्याने, तसेच ९१ वर्षांच्या कुतुबुद्दीन कप्तान यांचा सत्कार महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आला.

# ज्ञानयज्ञातून संयुक्त जयंती उत्साहात साजरी २५० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड। प्रतिनिधी**

फुले शाहू आंबेडकर बहुजन विकास मंडळ,नांदेड यांच्या वतीने जिजामाता प्राथमिक शाळा व माध्यमिक विद्यालय येथे संयुक्त जयंतीनिमित्त महापुरुषांच्या जीवन व कार्यावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धेचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.सकाळी ११ ते १२ या वेळेत पार पडलेल्या या स्पर्धेत तब्बल २५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ज्ञानाची ज्योत अधिक प्रखर केली.



ही स्पर्धा माता रमाई भीमराव आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज आणि संत गाडगे महाराज यांच्या पावन जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आली होती.विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या कार्याचा सखोल परिचय व्हावा,त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळावी आणि समाजाभिमुख दृष्टीकोन विकसित व्हावा,या उद्देशाने हा ज्ञानयज्ञ राबविण्यात आला.

आजकाल अनेक ठिकाणी जयंती कार्यक्रम ढोल-ताशांच्या गजरात साजरे केले जातात;मात्र फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा घोषणांपुरता मर्यादित न ठेवता तो विद्यार्थ्यांच्या बुद्धीमध्ये आणि कृतीत रुजावा, या भूमिकेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नाचण्यात क्षणिक आनंद असतो;पण विचारांच्या प्रसारात शाश्वत परिवर्तन असते, या संदेशातून आयोजकांनी जयंती साजरी करण्याची विधायक परंपरा जपली.या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री.हांडे एम.एन., महात्मा बसवेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.मुखेड आर. एन., श्री.लांडगे ए.एस.,श्रीमती गोंड एस. टी.,संस्थेच्या अध्यक्षा सुरेखाताई गायकवाड,सुषमाताई डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे, राहुल गायकवाड,अविनाश भालेराव, दिगांबर दादा हनुमंते,कैलास जोंधळे,राहुल बहादूरे तसेच सर्व शिक्षकवृंद व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. प्रश्नपत्रिकेत महापुरुषांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना, सामाजिक कार्य,विचारधारा आणि समाजपरिवर्तनातील योगदान यावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, सामान्य ज्ञानाची जिज्ञासा आणि सामाजिक भान वाढीस लागणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

ज्ञानरूपी या उत्सवातून महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांच्या मनामनात रुजोत आणि समाजात सकारात्मक परिवर्तनाची बीजे पेरली जावीत, हीच खरी जयंती साजरी करण्याची परंपरा असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.या उपक्रमासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व सदस्यांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

# किल्लारी येथे महाशिवरात्री निमित्त निळकंठेश्वर मंदीरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

## जय महाकाल ग्रुपच्या वतीने निळकंटेश्वर मंदिरात रुद्राक्षअभिषेक व महा प्रसादचे वाटप

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**



किल्लारी येथील निळकंटेश्वर मंदिरात दि १५ फेब्रुवारी रोजी रविवारी महाशिवरात्री निमित्त महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. जय महाकाल ग्रुप च्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उज्जेन येथील रुद्राक्ष आणून रुद्राभिषेक करण्यात आला व अभिषेक झाल्या नंतर प्रत्येक भाविकास एक रुद्राक्ष व बेल वाटप करण्यात आले तसेच महाकाल ग्रुप च्या वतीने महाप्रसादाचे सुद्धा वाटप करण्यात आले यावेळी ग्रुप चे सर्व सदस्य व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अभिषेक करण्यास हि भाविकांची गर्दी झाली होती या वर्षी महाशिवरात्री हि रविवारी आल्याने किल्लारी येथील निळकंठेश्वर मंदीरात सकाळी ५ वाजल्या पासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

# महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त कलेश्वर मंदिर परिसरात भाविकांचा अक्षरशः महासागर

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**



सिरोंचा तालुक्यापासून काही अंतरावर असलेल्या कलेश्वर येथे मुक्तेश्वर श्वामी व दोन शिवलिंगच्या दर्शनासाठी गर्दी उसळला. पहाटेपासूनच हजारो भक्तांनी हर हर महादेवच्या जयघोषात मंदिर परिसर दुमदुमून सोडला होता. पवित्र गोदावरी नदी तीरावर स्नानासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. अनेकांनी कुटुंबासह गोदावरीत पवित्र स्नान करून व्रत-उपवासास सुरुवात केली. त्यानंतर महाकालेश्वर मंदिर येथे दर्शनासाठी लांबलचक रांगा लागल्या होत्या. काही ठिकाणी दर्शनासाठी दोन ते तीन तास प्रतीक्षा करावी लागत होती.

मंदिर प्रशासन आणि स्थानिक पोलिसांकडून गर्दी नियंत्रणासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत तसेच सुरक्षा व्यवस्थाही तैनात करण्यात आली होती. स्वयंसेवकांनीही शिस्तबद्ध रांगा ठेवण्यासाठी सहकार्य केले. महाशिवरात्री निमित्त मंदिर परिसरात भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दिवसभर वातावरण भक्तिमय झाले होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात आणि श्रद्धाभावात पार पडत असून प्रशासनाकडून भाविकांनी संयम बाळगून दर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाशिवरात्री निमित्त टेकडा ताल्ला येथील प्राणहिता नदीजवळील हनुमान मंदिरात भाविकांची गर्दी



**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तालुक्यात महाशिवरात्री उत्साहात व भक्तीभावात साजरी करण्यात आली. टेकडा ताल्ला येथील प्राणहिता नदीजवळ असलेल्या हनुमान मंदिरात या निमित्ताने भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिरात केवळ हनुमानाची मूर्ती असून भाविकांनी श्रद्धेने पूजा-अर्चा केली.

यावेळी रवि बारसागंडी (तालुका अध्यक्ष, All India Youth Federation) यांनी मंदिरात जाऊन हनुमानाचे दर्शन घेतले. त्यांनी तालुक्यातील नागरिकांच्या सुख, शांती व प्रगतीसाठी प्रार्थना केली. तसेच युवकांनी समाजात एकोपा व सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महाशिवरात्री निमित्त मंदिरात सकाळपासूनच अभिषेक, फुलांची आकर्षक सजावट व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक ग्रामस्थांनी मंदिर परिसराची स्वच्छता करून सुंदर सजावट केली होती. सायंकाळी भजन-कीर्तन कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.प्राणहिता नदीकाठचा निसर्गरम्य परिसर आणि मंदिरातील धार्मिक वातावरण यामुळे भाविकांना विशेष आनंद मिळाला. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवात सहभाग नोंदविला.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने टेकडा ताल्ला येथे धार्मिक उत्साहाचे सुंदर चित्र पाहायला मिळाले असून ग्रामस्थांनी शांततेत व उत्साहात हा सण साजरा केला.

# महाशिवराञी निमीत्त खरोसा येथे किर्तन महोत्सव व शिव महापुराण कथेला सुरुवात

## ह.भ.प साध्वी रुक्मिणी ताई हावरे यांच्या सुश्राव्यवाणीतून संगीतमय शिव महापुराण कथेचे आयोजन भाविकांनी कथा व किर्तनाचा लाभ घ्यावा देवस्थान समितीचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**



औसा तालुक्यातील खरोसा येथे एकेविस वर्षापासुन महाशिवराञी निमीत्त किर्तन महोत्सव व शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात येते.

खरोसा येथील प्रसिद्ध लेणीतील महादेव पिंडीला रथात विराजमान करुन खरोसा छञपती शिवाजी महाराज चौक ते खरोसा लेणी पर्यंत महादेव मुर्ती मिरवणुक काढण्यात आली ,या भव्य शोभायाञेत खरोसा गावातील महिलांनी डोक्यावर कलश पुजन घेत हर हर महादेव ,च्या जयघोषात मोठ्या उत्साहात मिरवणुकीत सहभाग घेतला , सात दिवस चालणार्या महाशिवराञी किर्तन महोत्सव व शिव महापुराण कथा सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत असलेले किर्तन कार ह.भ.प.राजेश पाटील महाराज.ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज कदम ,ह.भ.प निवृती इंदुरीकर महाराज देशमुख, ह.भ.प सदगूरु गहनिनाथ महाराज औसेकर ,ह.भ.प निरंजन भाईजी महाराज ,ह.भ.प आचार्य महिंद्रजी महाराज ,ह.भ.प नाना महाराज कदम सह किर्तनकारांच्या सुश्राव्य वाणीतुन किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे .दररोज भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी व महाप्रसादाचे वाटप देवस्थान समितीकडुन केल जात ,यावेळी महादेव मंदिर संस्थान समितीचे अध्यक्ष शिवाजी बिराजदार ,उपाध्यक्ष अजय साळुंके,सचिव सतीश खरपडे सहसचिव प्रशांत रोके, कोषाध्यक्ष सतीश स्वामी, सदस्य शिवशंकर सांगवे , बालाजी डोके सुरेश बिराजदार, हरिश्चंद्र जावळे प्रतीक्षा पाटील ,संगीता तोडकर,सह सरपंच ,उपसरपंच ,चेअरमन सह खरोसा गावातील ग्रामस्थ व भाविक उपस्थीत होते.

# होट्टल चालूक्य राजधानी तिर्थक्षेत्रात महाशिवरात्री निमित्त भक्तांची महासागर प्रमाणे गर्दी

## आरोग्य व रक्तादान शिबिरामध्ये रक्तदातांची प्रचंड प्रमाणे सहभाग

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

होट्टल चालूक्य राजधानी पवित्र तिर्थक्षेत्र मध्ये महाशिवरात्र निमित्त होट्टल नगरीतील भूमिपूत्रांच्या सौजन्यांने एक उल्लेखनिय असा हा आरोग्य व रक्तदान शिबिर यशस्वी पणे पूर्ण झाले असून त्या मध्ये एकूण दोनशेच्या वर विविध आजाराने ग्रस्त असलेले नागरीकांची मोफत तपासणी आणि त्यांना मोफत मेडिसिन देण्यात आले आहे .

त्यामूळे अनेक वयवृध्द आणि तरुणांचे खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक व वेळेचा बचत झालेले आहे .

याचप्रमाणे अतिशय श्रेष्ठ दान समजले जाणारे रक्तदान हा होट्टल चालूक्य राजधानीतील भूमिपूत्रांनी स्वतःहून पुढाकार घेऊन त्याच सोबत बाहेरून आलेले सिध्देश्वर भक्त यांनी सुद्धा उपवास असतांनाही रक्तदान करून एक आदर्श घडवून आणले आहे या शिबिरातून एकूण ६० तरुणांनी रक्तदान करून एक मोठा विक्रम या महाशिवरात्री निमित्त करण्यात आले. आहे .

या कार्यक्रमास विविध आजारांचे तज्ञ डॉक्टर उपस्थित राहून या पवित्र भूमित आपली सेवा या सिध्देश्वर चरणी अर्पण केली असून मोठ्या प्रमाणात विविध आजाराने ग्रस्त असलेल्या माता भगीनी आणि तरुणांचे आरोग्यांची मोफत तपासणी करण्यात आले.

देगलूर व बिलोलीचे मतदार संघाचे आमदार मा. जितेशभाऊ अंतापूरकर यांनी सिध्देश्वरांचे दर्शनासाठी सहकुटूंब येऊन या शिबिरास भेट देऊन रक्तदान केलेल्या तरुणांचे कौतूक केले आणि प्रमाण पत्र देऊन सर्वांचे मनोबळ वाढवून रक्तदानाचे महत्व पटवून दिले

मदिर परिसरात उपस्थितांना उपवासाचे साबूदाना खिचडी मोठ्या प्रमाणात मा. आमदार साहेब यांच्या तर्फे देण्यात आले आहे.

त्याच प्रमाणे अनेक भाविकांनी उपवासाचे फळे व साबूदाना वाटप केले.

होट्टल गावातील भूमिपूत्रांनी उपस्थित सर्व तंज्ञ डॉ. चे मनापासून आभार व्यक्त केले असून अजून या चालूक्य राजधानी मध्ये असे शिक्षण व आरोग्य विषयी जास्ती जास्त कसे कार्य करता येईल व त्यातून सर्व सामान्य जनतेला याचा फायदा होईल व पूढील काळात असेच उपक्रम समाजहिताचे करण्यांचे होट्टल चालूक्य राजधानीतील भूमिपुत्रानी निर्धार करून आणि होट्टल मोहत्सव लवकरात लवकर व्हावे ही अपेक्षा सिध्देश्वर चरणी प्रार्थना करून शिबिराचे समारोप करण्यात आले.



# तंत्रज्ञानाधारित शिक्षणासाठी बीडमध्ये जिल्हास्तरीय ATL प्रशिक्षण संपन्न

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

Atal Innovation Mission, NITI Aayog, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली अटल टिंकरिंग लॅब (ATL) उपक्रम सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा या उद्देशाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (SCERT), जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) बीड आणि Lend - Hand खपवळर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

हे प्रशिक्षण Dr. Parnerkar Maharaj Vidyalaya मांजरसुंबा येथे पार पडले. मागील सहा महिन्यांपासून दर महिन्याला तीन दिवसांचे प्रशिक्षण सत्र राबविण्यात आले असून शुक्रवारी या ज्ञानसमृद्ध आणि प्रेरणादायी उपक्रमाचा समारोप करण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नवोपक्रमाची जाणीव आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण विकसित करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. केवळ अटल टिंकरिंग लॅबची स्थापना करून चालणार नाही, तर ती नियमितपणे सक्रिय राहून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाली पाहिजे, असे आवाहन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डशपव - क्रूपव खपवळर, पुणे संस्थेचे प्रशिक्षक रामदास लोमटे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डायटच्या अधिव्याख्याता डॉ. श्रीमती सुलोचना पवार यांची उपस्थिती लाभली. तसेच विद्यालयाचे प्राचार्य श्री आगवन सर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील २३ शाळांमधील विज्ञान, गणित, इंग्रजी व आयटी कौशल्य विषयाचे



शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. सहभागी शिक्षकांनी आधुनिक शैक्षणिक साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, डिझाईन थिंकिंग आणि संगणकीय कौशल्य विकसित करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. मा. रामदास लोमटे यांनी सुस्पष्ट व प्रभावी मार्गदर्शनातून अटल लॅबची संकल्पना आत्मसात करून दिली. प्रोग्रामिंगसारखा विषय सोप्या शब्दांत समजावून सांगत त्यांनी शिक्षकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. शांत, संयमी व दूरदृष्टी असलेल्या त्यांच्या नेतृत्वामुळे विविध ठिकाणाहून आलेल्या शिक्षकांना एकत्र बांधून ठेवणे शक्य झाले. या उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या प्रकल्पांचे जिल्हास्तरीय प्रदर्शन लवकरच आयोजित करण्यात येणार असून त्यातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ मिळणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बांगर सर यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्राचार्य श्री आगवन सर यांनी केले .या प्रशिक्षणातून प्रेरणा घेऊन प्रत्येक शिक्षक आपल्या शाळेत विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची बीजे रुजविण्यासाठी निश्चितच प्रयत्नशील राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# उमरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## विविध गीतावर विद्यार्थ्यांनी धरला ठेका

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील उमरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.या बाबतीत सविस्तर वृत्त असे की उमरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत दि.१४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी सायंकाळी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.या वेळी बालवाडीतील चिमुकल्यांनी, मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी देशभक्ती,भावगीते, लावण्या अशा विविध गीतावर ठेका धरत प्रेक्षकांचे मने जिंकली.



या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सुनील केंद्रे (गट शिक्षण अधिकारी केज),हे होते तर अध्यक्ष म्हणून राजाभाऊ इंगळे जी.प.उ.प्राथमिक शाळा उमरी (मुख्याध्यापक), हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय चाटे (जे.शी.वी.अ.केज),सरपंच सौ.सुमनबाई मुळे,बाळासाहेब सावंत(उपसरपंच) संजय चौरे,अर्जुन बोराडे,सुरेश काळे,देशमुख मॅडम,जगदाळे मॅडम, सौन्नर सर, मदने सर, मुंडे सर सहशिक्षक महादेव मुळे सर, लक्ष्मण घुले (सर), सौ.लता बांगर मॅडम,सौ.प्रणिता शिंदे मॅडम,अरुण पवार, सौ.प्रतिभा भडके मॅडम,भैय्यासाहेब मुळे,नाना मुळे, फोटोग्राफर रामदास मुळे, फोटोग्राफर भैरट,सुशेन मुळे,तुषार यादव,अश्रुबा खरात आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षक बाबासाहेब केदार व नाईकनवरे सर,यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक राजाभाऊ इंगळे यांनी मानले.

# प्रा.वि.दा.कराड विद्यालयात बारावीच्या परीक्षा सुरुळीत सुरू



दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळ यांच्यामार्फत सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षांचा केज येथील प्रा.विश्वनाथराव कराड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या परीक्षा केंद्रावर सुरळीत पणे प्रारंभ झाला आहे. अशी माहिती केंद्रप्रमुख प्राचार्या माधुरीताई मुंडे जाधवर यांनी दिली.

बारावीच्या परीक्षेसाठी शासन व परीक्षा मंडळाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालनकरण्यात येत आहे.परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडली जात आहे.तसेच विविध विभागांची भरारी पथके, बैठे पथके आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून परीक्षा प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना शांत,सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

या केंद्रावर केज शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी परीक्षा देत आहेत.शासनाच्या निर्देशानुसार यावर्षीची परीक्षा कॉपीमुक्त आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात आली असून परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे प्राचार्या माधुरीताई मुंडे जाधवर यांनी सांगितले आहे.

# मन्मथ पटणे यांना सहाय्यक महसूल अधिकारी पदी पदोन्नती

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज



अंबाजोगाई येथील तहसील कार्यालयाचे कर्मचारी मन्मथ पटणे यांची सहाय्यक महसूल अधिकारी पदी पदोन्नती मिळाली आहे. केज तालुक्यातील साळेगाव येथील रहिवाशी असलेले मन्मथ पटणे हे अंबाजोगाई येथे तहसील कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांना कालबद्ध सेवेअंतर्गत सहाय्यक महसूल अधिकारी पदी पदोन्नती मिळाली आहे. मन्मथ पटणे हे पूर्वी केज येथील तहसील कार्यालयात कार्यरत होते. ते त्यांच्या कामात अत्यंत कर्त्यव्यकठोर आणि प्राणिक कर्मचारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या पदोन्नती बद्दल उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे, त्यांचे सर्व सहकारी आणि मित्रपरिवार यांनी मन्मथ पटणे यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# ईश्वर हा एकच मात्र रूपे अनेक ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

एको देव: सर्वभूतेषु गुढ : सर्व व्यापी सर्वभूतान्तरामा या उपनिषदातील श्लोकानुसार ईश्वर हा एकच असून त्याची रूपे अनेक आहेत तसेच सर्व प्राणी मात्रामध्ये गुढ रूपाने वास्तव्य करत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले.विडा येथे महाशिवरात्री निमीत्ताने आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होते.ज्ञानेश्वरादी सर्व संत हे विठ्ठल उपासक आहेत आणि या वारकरी संप्रदायाचे एक तत्व असून ते म्हणजे अनेकात्वांमध्ये एकत्व पाहणारा संप्रदाय आहे असे सांगितले या पर्व दिनानिमित्त त्यांनी कीर्तन सेवा करिता

स्वर्ग जयाची साळोंखा ।
समुद्र पाळी पिंड देखा ।।
शेषासरखि बैसका ।
जो आधार ही लोकीं ।

या संत ज्ञानेश्वरांच्या ईश्वर रूपाचे वर्णन पर अभंग वर निरूपण करताना त्यांनी ज्याची साळोंखा स्वर्गाला भिडली आहे व खालच्या पिंडीनेसमुद्राचा ठाव घेतला आहे जो शेषा सारखे बैठक करून बसला आहे तसेच ब्रह्मानंदी मन अर्पण करून ज्योतिर्लिंग हृदयात धारण केले असे भगवान शंकराच्या रूपाचे वर्णन केले आहे याप्रसंगी ह.भ.प सखारामजी कदम महाराज,महिपती बुवा ह.भ.प आंधळे बंधू,बाळा निर्मळ,तुकारामजी पटाईत,बबनदादा पवार, बाबा वाघ या भजनी मंडळी सह ह.भ.प केशव बापु देशमुख,पांडुरंग पवार,बाबासाहेब भाऊ, बळीराम देसाई,नवनाथ काका,भालेकर फौजी, नारायण देवा,जगन्नाथ गुरुजी यांच्यासह बहुसंख्येने महिला व पुरुष भक्त मंडळी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब सावंत यांच्या परिवाराने केले होते.

## विडा येथे महाशिवरात्र उत्सव संपन्न



# बोरगाव बु.येथील आरंभ फाऊंडेशन व अहिल्या प्रबोधनी मंच यांच्या वतीने भाविकांना शिवरात्री निमित्त मोफत फराळ वाटप

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

सामाजिक भान ठेऊन तळागाळापर्यंत आपले काम पोहचावे ह्याच उद्दिष्टाने आरंभ फाऊंडेशन व अहिल्या प्रबोधनी मंच गेली अनेक वर्षे नि:स्वार्थ भावनेने मनात यत्किंचितही किंतू परंतु न ठेवता सामाजिक सलोखा जपत आली असून त्याचाच एक भाग म्हणून महाशिवरात्री निमित्त श्री क्षेत्र उत्तरेश्र्वर पिंपरी येथे येणाऱ्या हजारो भाविकांसाठी मोफत फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले होते.आरंभ फाऊंडेशन व अहिल्या प्रबोधनी मंच सामाजिक,शैक्षणिक, कला,क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी छाप पाडीत असून समाजातील सर्वच जाती धर्मा तील युवकांचा व वृद्धांचा फाऊंडेशन व मंचाच्या उपक्रमांना यशस्वी पाठिंबा मिळत आहे. नि:स्वार्थ भावनेने सेवा घडावी व सामाजिक समतोल राखण्यासाठी आरंभ फाऊंडेशन व अहिल्या




प्रबोधनी मंच कायम कटिबद्ध असेल असे फाऊंडेशनचे सचिव व मंचचे अध्यक्ष श्री. दिपक रमेश होळकर यांनी म्हटले.हा उपक्रम राबविण्याची संकल्पना ड.श्री.उत्तरेश्वर बाबुराव निंगुळे ह्याची असून ती यशस्वीपणे पार पाडण्या करिता श्री.समाधान गाते यांनी अथक परिश्रम केले असून त्यास प्रतिसाद म्हणून गोविंद पोपळगट,अजय पोपळगट,शंभू वीर, बाळकृष्ण निंगुळे,पवन बोऱ्हाडे,विष्णू निंगुळे यांनी अपर मेहनतीतून हा उपक्रम यशस्वी करून दाखविला.तसेच सोमनाथ निंगुळे,नवनाथ गाते या ज्येष्ठनागरिकांनी मोलाचे मार्गदर्शन केले व निखिल मुसळे यांचे व्यवस्थापनाचे व विशेष उत्तम कौशल्य या उपक्रमास लाभले.

श्री.औदुंबर शिंदे यांनी या उपक्रमास हातभार म्हणून साबुदाणा एक कट्टा तसेच शेंगदाण्याचे योगदान दिले,श्री. शामराव फाटक,श्री.राम फाटक यांनी केळी वाटपासाठी सहकार्य केले.सदरील उपक्रम श्री. गोपाळ देव निंगुळे श्री.खंडोबा देवस्थानचे वसारीधारक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या ज्यांनी ह्या उपक्रमास हातभार लावला त्यांचे आभार आरंभ फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.ड.योगेश दिलीप चांगण यांनी मानले.

# कोल्हेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेंचे वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोल्हेवाडी अंतर्गत येणाऱ्या तिन्ही जिल्हा परिषद शाळांचे संयुक्त असे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या वार्षिक स्नेह संमेलनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल्हेवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिसाळ वस्ती, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डांगेवस्ती या तिन्ही शाळा सहभागी झाल्या होत्या.कोल्हेवाडी येथे जिल्हा परिषद शाळांचे वार्षिक स्नेह संमेलन प्रथमच आयोजीत करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राधाकिसन कांबळे साहेब,केंद्रप्रमुख लहुरी तसेच कोल्हेवाडीचे ग्राम पंचायत अधिकारी शंकर हेडगिरे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान गावच्या प्रथम नागरिक सौ.प्रेमाला नंदुलाल मिसाळ यांनी भूषवले.बाल कलाकारां च्या या सांस्कृतिक कार्यक्रमाला पंचक्रोशीतील लहान, थोर,महिला व पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.बाल कलाकारांचे कलागुण



पाहून ग्रामस्थांनी बक्षीसाचा व कौतुकांचा वर्षाव करत कार्यक्रमाची शोभा वाढवली. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तिन्ही जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक वृंद,गावच्या सरपंच व विद्यार्थी, पालक अशा सर्वांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन किरण जगदाळे सर यांनी केले.तर आभार प्रदर्शन नेमाने सर यांनी केले.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल,शाळा व ग्रामपंचायतच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077